वनसेवेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना वनसंरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दल तसेच वनसेवेतील उत्कृष्ट कार्याबद्दल पदके देण्याबाबत (सन २०१७-१८)

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक: एफएसटी-०५/१९/प्र.क्र.१३१/फ-४

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक: १५ जून, २०१९

वाचा:- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एफएसटी-१४/१९९९/प्र.क्र.२८०/फ-४, दिनांक ६.१२.२०००.

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एफएसटी-१४/०३/प्र.क्र.२३६/०८/फ-४, दिनांक १२.०१.२००४.

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एफएसटी-०८/१२/प्र.क्र.३८३/फ-४, दिनांक २९.१०.२०१२.

४) सदस्य सचिव पदक निवड समिती तथा मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), पुणे यांचे पत्र क्र. कक्ष-१/व.से./पदक प्रस्ताव/२१६/२०१९-२०, दि.०७.०६.२०१९

प्रस्तावना:

वनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धनाचे काम प्रभावीपणे करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्याकरीता तसेच त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल प्रोत्साहीत करण्याकरीता त्यांना राज्य स्तरावरुन पुरस्कार/बक्षिसे देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेनुसार वनविभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांनी केलेल्या वनसंरक्षणार्थ/ वन्यजीव संरक्षणार्थ/शोधकार्य/वनव्यवस्थापन / नाविन्यपूर्ण शोध याबद्दल प्रतिवर्षी सुवर्ण व रजत पदके देण्यात येतात.

२. अशी पदके देण्यापूर्वी वन विभागातील सर्व संबंधित मुख्य वनसंरक्षकांकडून उत्कृष्ट काम केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या नावाच्या शिफारशी मागविण्यात येतात. सदर शिफारशीस अनुलक्षून त्यांनी केलेल्या नाविण्यपूर्ण कामाचे स्वरुप तसेच त्यांचे गोपनीय अहवाल, सचोटी, चारित्र्य, तांत्रिक कार्यक्षमता, बुध्दिमत्ता व त्यांनी विकसीत केलेले तंत्रज्ञान इ. बाबींचा विचार करुन पदके प्रदान करण्यासाठी अधिकारी/ कर्मचाऱ्यांची निवड करण्यासंदर्भात प्रधान सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समितीची दि.१२.०६.२०१९ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

शासन निर्णय:

सन २०१७-१८ या वर्षात उत्कृष्ट काम केलेल्या ६ कार्य प्रकारासाठी पदके देण्याच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावाची तपासणी केल्यानंतर संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल सचोटी, चारित्र्य, तांत्रिक कार्यक्षमता व त्यांनी विकसीत केलेले तंत्रज्ञान इ. बाबी विचारात घेऊन सदरहू प्रस्तावातील सोबतच्या परिशिष्ट- अ मधील एकूण २३ अधिकारी / कर्मचारी यांना पदके देऊन गौरविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

२. पदके देऊन गौरविण्यात आलेले अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवापुस्तकात वरील बाबींची नोंद संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी घ्यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०६१५१२२३१६१२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.06.15 12:07:59 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने), महाराष्ट्र शासन

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण) पुणे.

प्रत:-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, वनविकास महामंडळ मर्यादित, नागपूर
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजीक वनीकरण, पुणे
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
७) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९) सर्व मुख्य वनसंरक्षक
१०) सर्व वनसंरक्षक
११) सर्व सह संचालक, सामाजीक वनीकरण वृत्त

१२) सर्व प्रादेशीक व्यवस्थापक, एफ.डी.सी.एम. लि.

१३) सर्व उप वनसंरक्षक

१४) सर्व उप संचालक, सामाजीक वनीकरण विभाग

१५) सर्व विभागीय व्यवस्थापक, एफ.डी.सी.एम. लि.

१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (पत्राने)

१७) प्रसिध्दि व माहिती अधिकारी (वने), महाराष्ट्र राज्य, नागपूर

१८) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव

१९) मा. राज्य मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव

२०) सोबत जोडलेल्या परिशिष्टातील सर्व पदक विजेत्या अधिकारी/ कर्मचारी यांना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे मार्फत

२१) निवड नस्ती, फ-४ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

शासन निर्णय क्रमांक: एफएसटी-०५/१९/प्र.क्र.१३१/फ-४, दिनांक: १५ जून, २०१९ च्या सोबतचे

<u>परिशिष्ट- अ</u>

<u>वनसेवेतील अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना वनसंरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दल तसेच वनसेवेतील उत्कृष्ट कार्याबद्दल पदके देण्याबाबत सन २०१७-१८.</u>

अ.क्र.	कार्य प्रकार	संवर्ग	वनवृत्ताचे नाव	अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव	पदक
१	अ) वन/वन्यजीव संरक्षण	वनरक्षक	नागपूर	श्री. निलेश दिलीप तवले	सुवर्ण
			औरंगाबाद	श्री. शिवसांब बाबुराव घोडके	सुवर्ण
			अमरावती	श्री. आकाश अनिलराव सारडा	सुवर्ण
			अमरावती	श्री. एन. बी. अहिरराव	रजत
			अमरावती	श्री. कैलास अशोकराव चौधरी	रजत
			गडचिरोली	श्री. सत्यपाल अजाबराव श्रीरामे	रजत
		वनपाल	गडचिरोली	श्री. विशाल अशोक सालकर	सुवर्ण
			अमरावती	श्री. विजय रामभाऊ बारब्दे	सुवर्ण
			गडचिरोली	श्री. रामचंद्र दुर्गया तोकला	रजत
			ठाणे	श्री. शरण मिलिंद देशपांडे	रजत
		वनक्षेत्रपाल	नागपूर	श्री. एन. आर. गावंडे	सुवर्ण
			पुणे	श्री. प्रताप लक्ष्मण कांबळे	रजत
		सहाय्यक वनसंरक्षक	यवतमाळ	श्री. एन. एन. जगताप	सुवर्ण
			ठाणे	श्री. सचिन बापूराव कंद	रजत
२	ब) वन/वन्यजीव व्यवस्थापन	वनरक्षक	अमरावती	श्री. फिरोजखान अन्वरखान	सुवर्ण
			नाशिक	श्रीमती छाया बालकदास बैरागी	रजत
		वनपाल	अमरावती	श्री. जी. एस. सावळे	रजत
		वनक्षेत्रपाल	गडचिरोली	श्री. किरण दिनकर पाटील	सुवर्ण
			पुणे	श्री. योगेश शिवाजी महाजन	रजत
३	क) नाविन्यपूर्ण / इतर विकासात्मक/ पूरक कार्य	विभागीय वन अधिकारी	कोल्हापूर	डॉ. शैलेंद्रकुमार बाळकृष्ण जाधव	सुवर्ण
४	ड) धाडसी / शौर्य /प्रगतीचे दृष्टीने केलेले विशिष्ट कार्य	कवायत शिक्षक	अमरावती	श्री. सुधीर शामराव आकेवार	सुवर्ण
		अनुरेखक	यवतमाळ	श्री. विश्वनाथ लक्ष्मणराव सुलभेवार	रजत
५	इ) वनविस्तार	वनमजूर	अमरावती	श्री. अनिल विनायकराव चौधरी	सुवर्ण

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.06.15 12:09:10 +05'30'

(अतुल कोदे)

सह सचिव (वने), महाराष्ट्र शासन